सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७

# महाराष्ट्र मोटार वाहने ( उतारूंवर कर आकारणी ) अधिनियम.

( दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित )

## Bombay Act No. LXVII of 1958

# The Maharashtra Motor Vehicles ( Taxation on Passengers ) Act.

*( As modified upto 15th August, 2014 )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१४

[ किंमत रु. ९.०० ]

एच ७५६

# महाराष्ट्र मोटार वाहने ( उतारूंवर कर आकारणी ) अधिनियम.

अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. .. | २ |
| २. | व्याख्या .. .. .. | २ |
| ३. | टप्पेगाड्यांतून नेण्यात येणाऱ्या उतारूंवर कर बसविणे .. .. | ३ |
| ३अ. | टप्पेगाडीतून नेण्यात येणाऱ्या उतारूंवर आणखी कर बसविणे .. .. | ४ |
| ४. | विवरणे सादर करणे .. .. .. | ४ |
| ५. | कर दरमहा शासकीय कोषागारात (अधिकाऱ्याकडे) भरणे .. .. | ५ |
| ५अ. | कराच्या उत्पन्नाचे उपयोजन .. .. .. | ५ |
| ६. | कोणतीही विवरणे सादर करण्यात आली नसतील त्या व इतर बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती .. | ५ |
| ७. | आकारणीतून सुटणारी भाडी .. .. .. | ६ |
| ८. | कर न भरण्याबद्दल शास्ती .. .. .. | ६ |
| ९. | कर वगैरे वसूल करणे .. .. .. | ६ |
| १०. | विवक्षित बाबतीत टप्पेगाडीच्या वापरावर निर्बंध .. .. .. | ७ |
| १०अ. | अति प्रदानाचा परतावा .. .. .. | ७ |
| ११. | मागणीविरुद्ध अपील .. .. .. | ७ |
| ११अ. | पुनरीक्षण .. .. .. | ७ |
| १२. | लेखे व नोंदवह्या सुस्थितीत ठेवणे .. .. .. | ८ |
| १३. | लेखे हजर करण्याचा आदेश देण्याचा अधिकार .. .. .. | ८ |
| १४. | प्रवेश व पाहणी करण्याचा अधिकार .. .. .. | ८ |
| १५. | अपराध व शिक्षा आणि सक्षम न्यायालय .. .. .. | ८ |
| १६. | कंपन्यांनी केलेले अपराध .. .. .. | ९ |

| कलमे | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १७. | अपराध आपसात मिटविणे .. .. .. | ९ |
| १८. | अधिकारी लोकसेवक असणे .. .. .. | १० |
| १९. | विवक्षित कार्यवाहीस रोध .. .. .. | १० |
| २०. | दावे आणि खटले यांसाठी मुदतमर्यादा .. .. .. | १० |
| २१. | विवक्षित उतारूंना कर भरण्यापासून सूट देण्याचा अधिकार .. .. | १० |
| २२. | नियम करण्याचा अधिकार .. .. .. | १० |
| अनुसूची | .. .. .. | ११ |

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७[1]

# **महाराष्ट्र मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम

[ दि. २७ ऑगस्ट, १९५८ रोजी राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यावर दि. ३ सप्टेंबर, १९५८ रोजी मुंबई सरकारचे राजपत्र, भाग चार, असाधारण, यात प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

खालील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.
सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.
सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.
सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.
सन १९७५* चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २. (९-६-१९७५) †
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५. (९-६-१९७५) †
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५. (२८-१२-१९७५) †
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७७. (१-४-१९७६) †
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. (१-६-१९७७) †
सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. (२७-१-१९८२) †
सन १९८८@ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५. (१८-२-१९८८) †
सन १९८९@@ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (१-४-१९८९) †
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५. (१-४-१९९४) †
सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५. (२२-२-२००८) †
सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४. (२२-८-२०१२) †

---

१. उद्देश व कारणे याच्या निवेदनासाठी मुंबई सरकारचे राजपत्र, १९५८ भाग पाच, असाधारण, पृष्ठ ३०५ पहा.

*. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अकरा याचे कलम ४ हे सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आले.

†. ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

@ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४ द्वारे सन १९८८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दोन निरसित करण्यात आला.

सन १९८८चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ चे कलम ३ खालीलप्रमाणे वाचावे :—

"कराराने घेतलेल्या वाहने चालविणाऱ्यांकडून केलेल्या करवसुलीचे विधिग्राह्यकरण."

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ आणि ५ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणाही टप्पे गाडी (स्टेज कॅरेज) चालविणाराने महाराष्ट्र मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८८ च्या प्रारंभाला किंवा त्यापूर्वी कोणत्याही कर अधिकाऱ्याकडे भरलेला कर व अशा (वाहन) प्रचालकाने अशा कर अधिकाऱ्याकडे अशा कर प्रदानाच्या संबंधात दाखल केलेली कोणतीही विवरणे ही जणू काही उक्त सुधारणा अधिनियमाच्या कलम २ द्वारे सुधारण्यात आलेल्या कलम ५ च्या तरतुदी या सर्व महत्त्वाच्या वेळी अंमलात होत्या असे समजून यथास्थिति वैधरीत्या व कायदेशीररीत्या भरण्यात आलेला कर किंवा दाखल करण्यात आलेली विवरणे असल्याचे मानण्यात येईल. १९८८ चा महाराष्ट्र ५.

@@ सन १९८९ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ चे कलम १३ खालीलप्रमाणे वाचावे :—

१३. या अधिनियमास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी कर प्राधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाकडून अधिकार प्रदान करण्यात आलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा यथास्थिति, विहित प्राधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेली, मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियमान्वये, कंत्राटी वाहने म्हणून वापरण्यात येणाऱ्या ऑम्निबसेस आणि खाजगी सेवा वाहने यांच्या बाबतीत कोणतीही आकारणी, फेर आकारणी, कोणताही कर बसविणे किंवा त्याची वसुली करणे यांच्या संबंधातील सर्व कार्यवाही अथवा त्यासंबंधातील कोणतेही अपील, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, जणूकाही हा अधिनियम करण्यात आला नव्हता असे मानून मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियमान्वये चालू ठेवण्यात येईल व त्याबाबतीत कार्यवाही करण्यात येईल. प्रलंबित कार्यवाहीची व्यावृत्ती.

** सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

**[१] [ राज्यामध्ये टप्पा वाहनांमधून रस्त्याने नेण्यात येणाऱ्या उतारूंवर कर बसविण्याकरिता तरतूद करण्याबाबत अधिनियम ]**

**ज्याअर्थी,** [२][ राज्यांत [३][ टप्पा वाहनांतून ] रस्त्याने नेण्यात येणाऱ्या ] उतारुंवर कर बसविण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, [४][महाराष्ट्र मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम], असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण [५][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

[६][ * * * * * * ]

व्याख्या.

**२.** संदर्भावरुन अन्य रीतीने अर्थ लावणे आवश्यक नसल्यास, या अधिनियमात —

[७][ * * * * * * ]

(१) "तांडा मालक" म्हणजे, शंभर किंवा अधिक टप्पेगाड्या चालविण्याचा परवाना धारण करणारी व्यक्ती ;

(२) "महिना" म्हणजे, कॅलेंडर महिना ;

(३) "नगरपालिका क्षेत्र" म्हणजे, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र ;

(४) "प्रचालक" म्हणजे, परवाना धारक म्हणून ज्या व्यक्तीचे नाव त्या परवान्यात नोंदलेले असेल अशी कोणतीही व्यक्ती ; [८][ आणि कोणतीही टप्पेगाडी परवान्याशिवाय उपयोगात आणली जात असेल किंवा उपयोग करावयास लावली असेल किंवा तिचा उपयोग करण्याची परवानगी देण्यात आली असेल तर, त्याबाबतीत, त्या संज्ञेत, मोटार वाहन अधिनियम, १९३९ या अन्वये ज्या व्यक्तीच्या नावे ती टप्पेगाडी नोंदवलेली असेल त्या व्यक्तीचा किंवा अशी टप्पेगाडी जिच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असेल अशा व्यक्तीचा समावेश होतो ] ;

१९३९ चा ४.

[९][(४-अ) "उतारू" म्हणजे, प्रवास भाडे दिल्यावर टप्पेगाडीतून नेण्यात येणारी (त्या वाहनाच्या संबंधात कामावर असलेला चालक, वाहक किंवा परवानाधारकाचा नोकर यांव्यतिरिक्त) कोणतीही व्यक्ती. ]

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ७ अन्वये मूळ पूर्ण नावाऐवजी हे नाव दाखल करण्यात आले. "मुंबई राज्यात विवक्षित वर्गाच्या सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनातून नेण्यात येणाऱ्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३ अन्वये "विवक्षित वर्गाच्या सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनातून नेण्यात येणाऱ्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला आणि नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

३. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८ अन्वये ''मुंबई राज्यात मोटारीच्या विवक्षित वर्गाच्या सार्वजनिक सेवा वाहनांतून आणि खाजगी सेवा वाहनांतून'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

५. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्य" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

६. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम २ अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले परंतु, उक्त पोट-कलम अशारितीने वगळण्यात आल्यामुळे तदन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीस बाध येणार नाही ; (यात त्या पोट-कलमान्वये काढलेल्या ज्या अधिसूचनेन्वये या अधिनियमाच्या इतर तरतुदी पूर्वीच अंमलात आणल्या असतील अशा कोणत्याही अधिसूचनेच्या अंमलाचा समावेश होईल आणि त्या अनुसार त्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू राहील.)

७. खंड (अ-१) हा, सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याचे कलम ९ (अ) अन्वये वगळण्यात आला.

८. हा मजकूर सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ३ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

९. खंड (४-अ) हा सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ च्या कलम ४ (ब) अन्वये नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(५) "विहित केलेले" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

(६) "परवाना" म्हणजे, राज्याच्या कोणत्याही भागात टप्पेगाडी [१][ * * * ] म्हणून मोटार वाहनाचा उपयोग करण्याचा अधिकार देणारा मोटार वाहन अधिनियम, १९३९ अन्वये दिलेला किंवा प्रतिस्वाक्षरी केलेला परवाना ;

१९३९ चा ४.

[२][ * * * * * * ]

(७) "टप्पेगाडी" म्हणजे, चालकाखेरीज सहापेक्षा अधिक व्यक्ती नेणारे किंवा नेण्याजोगे बनविलेले व संपूर्ण प्रवासासाठी किंवा प्रवासाच्या टप्प्यांसाठी, व्यक्तिशः उतारूंनी किंवा त्यांच्याकरिता दिलेल्या निरनिराळ्या भाड्याच्या रूपाने भाडे किंवा बक्षीस घेऊन उतारूंची ने-आण करणारे मोटार वाहन आणि तींत मोटार वाहन अधिनियम, १९३९ याच्या अर्थानुसार कराराचे वाहन म्हणून उपयोग केला असता अशा वाहनाचा [३][ * * * ] समावेश होतो ; [३][ * * * ]

१९३९ चा ४.

(८) "कर" म्हणजे, कलम ३ मध्ये उल्लेख केलेला कर. [४][आणि कलम ३-अ मध्ये निर्दिष्ट केलेला आणखी करसुद्धा असा आहे ;

(९) "कर अधिकारी" म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी संपूर्ण राज्याकरिता किंवा कोणत्याही एका किंवा अनेक क्षेत्रांकरिता कर अधिकारी म्हणून राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, ज्याची नेमणूक करील तो अधिकारी ; आणि संपूर्ण राज्याकरिता किंवा कोणत्याही क्षेत्राकरिता कर अधिकारी म्हणून एकापेक्षा अधिक अधिकारी राज्य शासनाला नेमता येतील ;

१९३९ चा ४. (१०) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम, १९३९ व तदन्वये केलेले नियम यांत जो दिलेला असेल तोच आहे, असे समजावे.

**३.** (१) [५][ * * * ] [६][ * * * ] [७][टप्पेगाड्यांतून रस्त्याने नेण्यात येणाऱ्या सर्व उतारूंवर] टप्पेगाड्या प्रचालकाला द्यावयाचे भाडे धरून त्या रकमेच्या [८][वीस टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या रकमेचे उत्पन्न येईल अशा राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे वेळोवेळी निश्चित करावयाच्या दराने] कर बसविण्यात येईल व तो शासनाला दिला पाहिजे.

टप्पेगाड्यातून नेण्यात येणाऱ्या उतारूंवर कर बसविणे.

[९][ * * * ]

---

१. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम ४ च्या कलम ४ (क) अन्वये "किंवा कराराचे वाहन" हे शब्द नेहमीकरिता वगळण्यात आल्याचे समजण्यात येईल.

२. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ च्या कलम ९ (अ) अन्वये खंड (६-अ) वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

४. हे शब्द, आकडे व अक्षरे १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम १ अन्वये दाखल करण्यात आली.

५. १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ च्या कलम ६ (अ) द्वारे "हा अधिनियम अंमलात आल्यावर" हे शब्द वगळण्यात आले.

६. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ४(अ) (१) अन्वये "कलम (१) च्या पोट-कलम (३) खालील" हे शब्द, कंस व आकडे वगळण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ४ (अ) (दोन) अन्वये "विराम वाहनातून नेण्यात येणारे उतारू" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

८. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ च्या कलम २ अन्वये "वीस टक्क्यांइतक्या रकमेचे उत्पन्न येईल अशा दराने" या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

९. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ४-अ (तीन) अन्वये "विरामवाहन केवळ नगरपालिका क्षेत्रातच किंवा राज्य शासन मंजुरी देईल अशा नगरपालिकेच्या किंवा त्यालगतच्या क्षेत्रातून जाणाऱ्या मार्गावरच चालविण्यात येत असेल त्या बाबतीत खेरीज करून" हा मजकूर वगळण्यात आला.

(२) १[ * * * ] टप्पेगाड्यांच्या प्रचालकाच्या ताब्यात असलेल्या टप्पेगाडीच्या किंवा टप्पेगाड्यांच्या बाबतीत प्रत्येक महिन्यात, भाडे धरून, प्रचालकास मिळालेल्या एकूण रकमेतून पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या कराच्या एकूण रकमेचा हिशेब केल्यावर, कराची एकूण रक्कम ही, आवश्यक असेल तेथे जवळच्या नया पैशात पूर्ण केली पाहिजे, अर्धा नया पैसा किंवा त्यापेक्षा अधिक भाग एक नया पैसा म्हणून गणला पाहिजे व अर्ध्याहून कमी भाग सोडून दिला पाहिजे.

टप्पेगाड्यातून नेण्यात येणाऱ्या उतारूंवर आणखी कर बसविणे.

२[३-अ. कलम ३, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, ३[*महाराष्ट्र मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी)(सुधारणा) अधिनियम, १९९३] च्या प्रारंभीच्या तारखेला आणि त्या तारखेपासून कलम ३ अन्वये बसविण्यात आणि राज्य शासनास देण्यात येणाऱ्या कराव्यतिरिक्त — १९९३ चा ५

(अ) केवळ एखाद्या नगरपालिकेच्या क्षेत्रात किंवा राज्य शासनाने, शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेल्या मार्गावरूनच केवळ चालणाऱ्या वाहनाच्या बाबतीत केलेल्या प्रवासाचे भाडे हे याद्वारे बसविण्यात येणारा आणखी कर वगळता ४[दोन रुपयांपर्यंत असेल त्याबाबतीत दहा पैसे दराने व केलेल्या प्रवासाचे भाडे हे याद्वारे बसविण्यात येणारा आणखी कर वगळता दोन रुपयाहून अधिक असेल त्याबाबतीत, पंधरा पैसे कराने] ;

५[ * * * * * ]

**स्पष्टीकरण :**— या कलमाच्या प्रयोजनासाठी "टप्पेगाडीतून रस्त्याने नेण्यात येणारे उतारू" या शब्दप्रयोगात टप्पेगाडीतून रस्त्याने मोफत किंवा चालकाने दिलेल्या कोणत्याही सवलतीच्या तिकिटाच्या प्राधिकारावर नेण्यात येणारे उतारू किंवा कलम २१ अन्वये सूट देण्यात आलेले किंवा आंतरराज्य मार्गावर टप्पेगाडीतून नेण्यात येणारे उतारू किंवा करार वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या टप्पेगाडीतून ६[ * * * ] नेण्यात येणारे उतारू ६[ * * * ] यांचा समावेश होणार नाही.

विवरणे सादर करणे.

४. (१) प्रचालकाने त्याच्या ताब्यातील टप्पेगाडीच्या किंवा टप्पेगाड्यांच्या बाबतीत, कर अधिकाऱ्यास किंवा कर अधिकारी निर्दिष्ट करील अशा विहित अधिकाऱ्यास दररोज किंवा विहित करण्यात येईल अशा कालांतराने विहित केलेल्या नमुन्यात व रीतीने एक विवरण सादर केले पाहिजे किंवा सादर करण्याची व्यवस्था केली पाहिजे :

परंतु (टप्पेगाड्या) चालविणाऱ्या इतर व्यक्तींच्या संबंधात या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी केलेल्या नियमांपेक्षा वेगळे नियम तांडा मालकाच्या संबंधात विहित करता येतील.

(२) विहित केलेल्या अधिकाऱ्यास कोणतेही विवरण मिळेल तेव्हा त्याने ते विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या रीतीने कर अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे.

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ कलम ४ (ब) अन्वये "परवान्यान्वये" हे शब्द वगळण्यात आले.
२. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम २ अन्वये कलम (३-अ) दाखल करण्यात आले.
३. १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ च्या कलम २ (१) द्वारे "महाराष्ट्र मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) (सुधारणा) अधिनियम," या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ च्या कलम २(२) द्वारे "केलेल्या प्रवासाचे भाडे" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "पाच पैसे दराने" या मजकुराने संपणाऱ्या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम ४ द्वारे खंड (ब) वगळण्यात आला.
६. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ च्या कलम १० द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
*. आता महाराष्ट्र मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) (सुधारणा) अधिनियम, १९९३ असे बदलण्यात आले. (सन २०१२ चा महा. २४).

५. कलम ४ अन्वये सादर केलेल्या विवरणानुसार कोणत्याही महिन्यात देण्याजोगा कर हा प्रचालकाने [1][ * * * ] तांडा मालकांच्या व इतर प्रचालकांच्या बाबतीत विहित करण्यात येईल किंवा येतील अशा पुढील महिन्यातील तारखेस किंवा तारखांना किंवा तत्पूर्वी [2][कर अधिकाऱ्याकडे भरला पाहिजे]. कर दरमहा [4][कर अधिकाऱ्याकडे भरणे].

[3][परंतु नोंदणीकृत असलेले किंवा महाराष्ट्र राज्यातील परिवहन प्राधिकरणाखेरीज अन्य कोणत्याही परिवहन प्राधिकरणाने ज्याच्या संबंधात परवाना दिला आहे असे कोणतेही टप्पे गाडी (स्टेज कॅरेज) महाराष्ट्र राज्यास कंत्राटी वाहन म्हणून चालविणाराने त्यासंबंधात देय असलेला कर असे कराराने घेतलेले वाहन महाराष्ट्र राज्यात आणताना नजिकच्या कर अधिकाऱ्याकडे भरला पाहिजे. तसेच अशा (वाहन) प्रचालकाने, अशा कराच्या संबंधात, दैनिक विवरणाकरिता विहित करण्यात आलेल्या नमुन्यात कर अधिकाऱ्याकडे विवरण सादर केले पाहिजे ; व अशा कराराने घेतलेल्या वाहनाने केलेला प्रवास महाराष्ट्र राज्यात समाप्त होत असेल व त्यानंतर ते कराराने घेतलेले वाहन उतारूंसह पुढील प्रवासास किंवा परतीच्या प्रवासास प्रारंभ करीत असेल तर त्याबाबतीत, देय असलेला कर, जिथून अशा प्रकारे प्रवासास प्रारंभ होतो अशा ठिकाणापासून निकटतम असलेल्या क्षेत्राच्या कर अधिकाऱ्याकडे किंवा अशा प्रवासास सार्वजनिक सुटीच्या दिवशी प्रारंभ होत असल्यास, अन्य कोणत्याही कर अधिकाऱ्याकडे, अशा वाहनाने राज्याची सीमा सोडण्यापूर्वी भरला पाहिजे, तसेच असा (वाहन) प्रचालक अशा कराच्या संबंधातील उपरोक्त विवरणदेखील कर अधिकाऱ्याकडे सादर करील].

[5][ * * * * * ]

६. पुढील बाबतीत, म्हणजे — कोणतीही विवरणे सादर करण्यात आली नसतील त्या व इतर बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती.

(अ) जेव्हा, कोणत्याही टप्पेगाडीच्या बाबतीत प्रचालकाने कोणत्याही महिन्याची किंवा त्याच्या भागाची कोणतीही विवरणे सादर केली नसतील, किंवा

(ब) जेव्हा, कोणत्याही टप्पेगाडीच्या बाबतीत प्रचालकाने सादर केलेली कोणत्याही महिन्याची किंवा त्याच्या भागाची विवरणे कर अधिकाऱ्यास चुकीची किंवा अपूर्ण वाटत असतील,

तेव्हा, [6][कर अधिकाऱ्याने, कोणत्याही वेळी] (अ) च्या बाबतीत, त्याला कोणतेही अभिवेदन करावयाचे असल्यास ते करण्याची आणि (ब) च्या बाबतीत त्याने सादर केलेल्या विवरणांचा बिनचूकपणा व पूर्णपणा सिध्द करण्याची वाजवी संधी टप्पेगाडी प्रचालकास दिल्यानंतर अशा महिन्याच्या किंवा त्याच्या भागाच्या मुदतीत टप्पेगाडी प्रचालकाने राज्य शासनाला करादाखल द्यावयाची रक्कम ठरविली पाहिजे :

---

१. सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ कलम २ (अ) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) द्वारे हे परंतुक दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम २(ड) द्वारे "शासकीय कोषागारात भरणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४ अन्वये कलम ५ अ वगळण्यात आले.

६. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ५ अन्वये "कर अधिकाऱ्याने" या शब्दाऐवजी वरील शब्द जादा दाखल करण्यात आले.

परंतु, अशा रीतीने ठरविण्यात आलेली रक्कम, अशा महिन्याच्या किंवा त्याच्या भागाच्या मुदतीत, टप्पेगाडीतून जास्तीत जास्त उतारू नेण्यात आले असता राज्य शासनाला कराची जी कमाल रक्कम द्यावी लागली असती त्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

आकारणीतून सुटणारी भाडी.

७. जर कोणत्याही कारणासाठी कोणत्याही महिन्यात या अधिनियमान्वये बसविण्याजोग्या संपूर्ण कराची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची आकारणी झालेली नसेल तर, कर अधिकाऱ्यास तो महिना संपल्यापासून एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी परंतु एक वर्षाहून उशिरा नाही अशा मुदतीत टप्पेगाडी प्रचालकास नोटीस दिल्यानंतर व त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर, ज्या कराची आकारणी झालेली नसेल त्याची आकारणी करता येईल :

[1][ * * * * * ]

कर न भरण्याबद्दल शास्ती.

८. कलमे ५, ६ व ७ यानुसार कोणत्याही महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता कोणत्याही टप्पेगाडीच्या संबंधात राज्य शासनाला देण्याजोग्या कराची सर्व रक्कम किंवा तिचा कोणताही भाग त्याच्याकडे योग्य वेळेच्या आत भरण्यात आला नसेल त्या बाबतीत कर अधिकाऱ्यास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा महिन्याच्या किंवा त्याच्या भागाच्या मुदतीत अशा टप्पेगाडीत जास्तीत जास्त उतारू नेण्यात आले असते तर राज्य शासनाकडे जो कमाल कर भरावा लागला असता त्या कराच्या २५ टक्क्यांहून अधिक नसेल इतका दंड अशा रीतीने भरावयाच्या कराच्या जोडीने बसवता येईल.

कर वगैरे वसूल करणे.

९. (१) कलमे ६, ७ व ८ यात निर्दिष्ट केलेल्या बाबतीत कर अधिकाऱ्याने राज्य शासनाला द्यावयाच्या रकमांकरिता टप्पेगाडी प्रचालकावर मागणीची नोटीस बजावली पाहिजे आणि अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या रकमा या जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे प्रचालकाकडून वसूल करता येतील.

(२) जेव्हा मागणीच्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या रकमा, ज्या तारखेस टप्पेगाडी प्रचालकावर उक्त नोटीस बजाविण्यात आली असेल त्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत देण्यात आल्या नसतील तेव्हा, ज्या टप्पेगाडीच्या संबंधात असा कर देणे असेल ती टप्पेगाडी व त्याच्याबरोबर असलेले इतर सामान जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्यासंबंधीच्या योग्य त्या कायद्यान्वये अटकावून ठेवता व विकता येईल, मग असे वाहन किंवा त्याच्याबरोबरचे सामान टप्पेगाडी प्रचालकाच्या ताब्यात किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असो वा नसो :

परंतु, राज्य शासनाच्या किंवा याबाबत राज्य शासन प्राधिकृत करील अशा इतर अधिकाऱ्याच्या सांगण्यावरुन किंवा त्याच्या संमतीने असेल त्याव्यतिरिक्त या पोट-कलमानुसार कोणतीही अटकावणी करता कामा नये.

(३) पोट-कलम (२) अन्वये करावयाची अटकावणी ही, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश होईल अशा अधिकाऱ्यांना किंवा अधिकारी वर्गास करता येईल आणि अशी अटकावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने त्यासंबंधीच्या कार्यवाहीचे कागदपत्र अटकावलेल्या वस्तूंसह, पोट-कलम (२) अन्वये पुढील उपाययोजनेसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजेत.

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ च्या कलम ११ द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

**१०.** [1][राज्यातील कोणत्याही रस्त्यावरून उतारूंची ने-आण करण्यासाठी कोणत्याही] टप्पेगाडीचा पुढील बाबतीत वापर करता कामा नये :— विवक्षित बाबतीत टप्पेगाडीच्या वापरावर निर्बंध.

(अ) कलम ९ मध्ये निर्दिष्ट केलेली मागणीची नोटीस प्रचालकावर बजाविल्यानंतर पंधरा दिवसांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत त्या संबंधात देण्याजोगा कोणतीही कर किंवा दंड भरण्यात आला नसेल अशा बाबतीत, असा कर किंवा दंड भरण्यात येईपर्यंत, किंवा

(ब) कलम ४ अन्वये आवश्यक असलेली विवरणे जर दररोज सादर करणे आवश्यक असेल तर सात दिवसांहून जास्त दिवस आणि जर कमी दिवसांच्या अंतराने विवरणे सादर करण्याचे विहित केले असेल तर, विहित करण्यात येईल इतक्या वेळा व अशा मुदतीत, सादर न केल्यास, ती विवरणे सादर करण्यात येईपर्यंत :

परंतु, खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेली विवरणे सादर करण्यात झालेली कसूर जाणूनबुजून करण्यात आली नव्हती अशी कर अधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने टप्पेगाडी प्रचालकाने सिद्ध केल्यास कर अधिकाऱ्यास त्या खंडाच्या प्रवर्तनापासून सूट देता येईल.

[2][**१०-अ.** कर अधिकाऱ्याने प्रचालकास त्याच्याकडून येणे असलेल्या रकमेहून त्याने कराची व दंड असल्यास दंड म्हणून जी कोणतीही अधिक रक्कम दिली असेल ती रक्कम विहित करण्यात येईल त्या रीतीने परत केली पाहिजे. अशी परत करावयाची रक्कम एकतर रोख रकमेच्या स्वरूपात किंवा प्रचालकाच्या विकल्पानुसार कोणत्याही इतर मुदतीच्या संबंधात येणे असलेला कर व दंड असल्यास त्या रकमेतून अशी अधिक रक्कम वजा करून तो परत करता येईल : अति प्रदानाचा परतावा.

परंतु, कर अधिकाऱ्याने प्रथमतः येणे असलेल्या ज्या कोणत्याही रकमेच्या वसुलीच्या संबंधात कलम ९ चे पोट-कलम (१) अन्वये प्रचालकावर नोटीस बजावण्यात आली असेल ती रक्कम वसूल करण्यासाठी अशा अधिक रकमेचा उपयोग केला पाहिजे आणि त्यानंतर रक्कम शिल्लक राहिल्यास ती रक्कम परत केली पाहिजे.]

**११.** (१) कलम ९ अन्वये प्रचालकावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीला हरकत घेणाऱ्या कोणत्याही प्रचालकास नोटीस बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल : मागणीविरुद्ध अपील.

परंतु, अपीलकर्त्याने देणे असल्याचे मान्य केलेला कर दिल्याचा समाधानकारक पुरावा अपिलासोबत असल्याखेरीज कोणतेही अपील दाखल करून घेता कामा नये.

(२) विहित केलेल्या प्राधिकाऱ्यास अपीलकर्त्याला त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्यानंतर, अपीलावर त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

[3][**११-अ** (१) राज्य शासनास, (किंवा राज्य शासनाने याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या शासनाच्या उपसचिवाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा अधिकाऱ्यास) स्वतः होऊन किंवा त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून, कोणत्याही अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कागदपत्रे मागविता येतील आणि त्यांची तपासणी करता येईल. तसेच राज्य शासनास किंवा अशा अधिकाऱ्यास त्या बाबतीत न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल : पुनरीक्षण.

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ६ अन्वये "राज्यातील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ च्या कलम २ अन्वये कलम १०-अ समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ७ अन्वये कलम ११-अ समाविष्ट करण्यात आले.

परंतु, आदेशाच्या तारखेपासून चार महिन्यांच्या मुदतीत असा अर्ज करण्यात आला नसेल तर, तो या कलमान्वये दाखल करून घेता कामा नये :

तसेच, अशा कोणत्याही आदेशाचे पुनरीक्षण करण्यासाठी केलेला अर्ज नामंजूर करण्यापूर्वी, राज्य शासनाने किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्याने तो अर्ज नामंजूर करण्याबाबतची कारणे नमूद केली पाहिजेत.

(२) या कलमान्वये देण्यात येणाऱ्या आदेशामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल त्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यावाचून राज्य शासनाने किंवा, यथास्थिति, पदनिर्देशित अधिकाऱ्याने, या कलमान्वये कोणताही आदेश देता कामा नये.

(३) ज्या प्रचालकास कलम ११ अन्वये अपील करता आले असते परंतु ज्याने कोणतेही अपील दाखल केले नसेल अशा कोणत्याही प्रचालकाच्या अर्जावरून या कलमान्वये पुनरीक्षणाचे कोणतेही कामकाज दाखल करून घेता कामा नये.]

लेखे व नोंदवह्या सुस्थितीत ठेवणे.

**१२.** प्रत्येक प्रचालकाने टप्पेगाडीच्या बाबतीत व त्यातून प्रवास करणाऱ्या उतारूंच्या संबंधात गोळा केलेल्या भाड्याच्या बाबतीत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात लेखे व नोंदवह्या ठेवल्या पाहिजेत व सुस्थितीत राखल्या पाहिजेत.

लेखे हजर करण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

**१३.** कलम ११, पोट-कलम (१) अन्वये विहित केलेल्या प्राधिकाऱ्यास किंवा कर अधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने यासंबंधात अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास आदेशाद्वारे आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील असे लेखे, नोंदणी-पुस्तके व दस्तऐवज हजर करण्यास आणि टप्पेगाडीसंबंधीची आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती पुरविण्यास कोणत्याही प्रचालकास फर्मावता येईल.

प्रवेश व पाहणी करण्याचा अधिकार.

**१४.** (१) राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्यान्वये तयार केलेल्या कोणत्याही नियमांचे पालन होते किंवा नाही हे पाहण्यासाठी किंवा पडताळण्यासाठी, कोणत्याही टप्पेगाडीत व असे वाहन ठेवण्यासाठी प्रचालक मोटारघर म्हणून किंवा त्याच्या धंद्याची लेखापुस्तके ठेवण्यासाठी जी जागा सामान्यपणे वापरीत असेल त्या कोणत्याही जागेत सर्व वाजवी वेळी प्रवेश करता येईल, त्याची व तिची पाहणी करता येईल व झडती घेता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये घेतलेल्या सर्व झडत्या [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] च्या तरतुदींप्रमाणे घेतल्या पाहिजेत. १८९८ चा ५.

अपराध व शिक्षा आणि सक्षम न्यायालय.

**१५.** (१) जी कोणतीही व्यक्ती —

(अ) जो प्रचालक कलम ४ अन्वये चुकीचे किंवा अपूर्ण विवरण सादर करील किंवा सादर करू देईल किंवा, त्या कलमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे विवरण सादर करण्यात कसूर करील, किंवा

(ब) जो प्रचालक, तिच्याकडून येणे असलेला कोणताही कर देण्याचे लबाडीने टाळील किंवा टाळू देईल, किंवा

(क) जो प्रचालक, तिने सादर केलेल्या कोणत्याही विवरणपत्रात किंवा तिने सुस्थितीत ठेवलेल्या कोणत्याही लेख्यात किंवा नोंदवहीत कोणतीही चुकीची नोंद लबाडीने करील किंवा करू देईल किंवा त्यात कोणतीही नोंद करण्याचे लबाडीने वर्जील किंवा वर्जू देईल, किंवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांचे किंवा त्यानुसार दिलेल्या कोणत्याही आदेशांचे जाणूनबुजून उल्लंघन करील,

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ च्या कलम १२ अन्वये "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता, जास्तीत जास्त एक हजार रुपयापर्यंत दंडाची शिक्षा होईल आणि इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने त्याच्या आदेशात तसे निर्दिष्ट केल्यास, जी रक्कम, सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीने देण्याची टाळलेली रक्कम आहे असा निर्णय दुसऱ्या वर्गाचा दंडाधिकारी देईल ती निर्दिष्ट रक्कम, जणू काही तो दंड असल्याप्रमाणे, सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीने जादा दिली पाहिजे.

(२) या अधिनियमान्वये शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाची इलाखा शहर दंडाधिकारी किंवा दुसऱ्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाने चौकशी किंवा न्यायचौकशी करता कामा नये.

**१६.** (१) या अधिनियमाखाली येणारा अपराध एखाद्या कंपनीने केला असल्याच्या बाबतीत अपराध घडल्याच्या वेळी कंपनी जिच्या स्वाधीन होती व कंपनीचे काम चालविण्यासाठी कंपनीला जी जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी, त्या अपराधाबद्दल दोषी आहेत असे समजले पाहिजे आणि त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध कायदेशीर इलाज केला जाण्यास व शिक्षा दिली जाण्यास त्या पात्र असतील : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, जर कोणत्याही अशा व्यक्तीने अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती हे सिध्द केल्यास या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाखाली येणारा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याच्या हयगयीमुळे उक्त अपराध घडला असल्याचे सिद्ध करण्यात आल्यास असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी आहे असेही समजले जाईल आणि त्याप्रमाणे तो त्याच्याविरुद्ध कायदेशीर इलाज केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण :—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी —

(अ) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ, निगम निकाय, असा समजावा आणि तीत भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो ; आणि

(ब) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" या संज्ञेचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेचा भागीदार, असा समजावा.

**१७.** (१) कर अधिकाऱ्यास, कलम १५ अन्वये शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा केल्यानंतर, अशा अपराधाचा आरोप केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून असा अपराध आपसात मिटविण्यासाठी जेव्हा आरोप केलेला अपराध कर चुकविण्याच्या स्वरूपाचा असेल तेव्हा, अशा रीतीने वसूल करण्याजोग्या कराच्या रकमेव्यतिरिक्त वसूल करण्याजोग्या कराच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम आणि इतर बाबतीत अडीचशे रुपयापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम स्वीकारता येईल. अपराध आपसात मिटविणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये कर अधिकाऱ्याने ठरविलेली रक्कम दिल्यावर त्याच अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही उपाययोजना करता कामा नये.

अधिकारी लोकसेवक असणे.

१८. या अधिनियमान्वये काम करणारे सर्व अधिकारी, भारतीय दंड संहितेच्या २१ व्या कलमाच्या अर्थाप्रमाणे लोकसेवक आहेत असे समजले पाहिजे. १८६० चा ४५.

विवक्षित कार्यवाहीस रोध.

१९. (१) या अधिनियमान्वये केलेल्या किंवा केल्याचे दिसून येणाऱ्या कोणत्याही कृत्याबद्दल शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरूद्ध राज्य शासनाच्या आगाऊ मंजुरीवाचून फौजदारी न्यायालयात, कोणताही खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(२) शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने या अधिनियमावरून किंवा तद्न्वये लादण्यात आलेली कर्तव्ये बजाविण्याच्या किंवा कामे पार पाडण्याच्या ओघात सद्भावनापूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्याबाबत तो शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कारवाई केली जाण्यास पात्र असणार नाही.

दावे आणि खटले यांसाठी मुदतमर्यादा.

२०. या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबाबत राज्याविरुद्ध कोणताही दावा, किंवा इतर कार्यवाही आणि शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुध्द किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायद्याचे काम ही, ज्या कृतीबद्दल तक्रार करण्यात आली असेल त्या कृतीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत दाखल केलेली असतील त्याव्यतिरिक्त असा दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

विवक्षित उतारूंना कर भरण्यापासून सूट देण्याचा अधिकार.

२१. राज्य शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे [1][ज्या टप्पेगाड्या केवळ नगरपालिका क्षेत्रातच किंवा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा नगरपालिकेच्या किंवा त्यालगतच्या क्षेत्रातून जाणाऱ्या मार्गावरच चालविण्यात येत असतील अशा टप्पेगाडीतून नेण्यात येणाऱ्या उतारूंना किंवा] अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा आंतरराज्य मार्गावर टप्पेगाडीतून नेण्यात येणाऱ्या किंवा कोणत्याही शैक्षणिक, वैद्यकीय, लोकहितैषी किंवा इतर उद्दिष्टाच्या अभिवृद्धीसाठी चालविण्यात येणाऱ्या टप्पेगाडीतून नेण्यात येणाऱ्या उतारूंना कर भरण्यापासून संपूर्ण किंवा अंशतः सूट देता येईल.

नियम करण्याचा अधिकार.

२२. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वोक्त अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल —

(अ) कलम ४ अन्वयेची विवरणे ज्याने स्वीकारावयाची तो अधिकारी आणि त्या कलमान्वयेची विवरणे ज्या कालांतराने, (तसे कालांतर असल्यास) सादर करावयाचे असेल ते कालांतर आणि अशा अधिकाऱ्याने ज्या मुदतीत आणि ज्या रीतीने विवरण कर अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे ती मुदत व ती रीत ;

(ब) टप्पेगाडी प्रचालकांनी ठेवावयाचे लेखे आणि नोंदवह्या आणि सादर करावयाची विवरणे व विवरणपत्रके ;

(क) या अधिनियमान्वये मागणीच्या नोटिसा बजावण्याची रीत ;

(ड) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये व अधिकार ;

(ई) कलम ११, पोट-कलम (१) अन्वये ज्या प्राधिकाऱ्याकडे अपील करावयाचे तो प्राधिकारी ;

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ८ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

(फ) या अधिनियमाखालील कार्यवाहीत अनुसरावयाची कार्यपद्धती आणि स्वीकारावयाचे नमुने, यांचे सर्वसाधारण नियमन करणे ;

(ग) या अधिनियमान्वये जी विहित करण्याची आवश्यकता किंवा मुभा असेल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमान्वये दिलेला नियम करण्याचा अधिकार, तो वापरण्याचा पहिला प्रसंग वगळता असे नियम कमीत कमी एक महिना आगाऊ प्रसिध्द केले पाहिजेत या शर्तीस अधीन असेल.

(४) या कलमान्वये केलेले सर्व नियम **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केले पाहिजेत आणि ते नंतरची कोणती तरी तारीख नेमण्यात आली नसेल तर अशा प्रसिध्दीच्या तारखेस अंमलात येतील.

[1][(५) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, कमीत कमी तीस दिवसांच्या मुदतीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवले पाहिजेत आणि अशा रीतीने ते ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगत पुढील अधिवेशनात विधानमंडळ त्यात जे फेरफार करील त्या फेरफारास अधीन असतील व त्यानंतर ते **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केले जातील.]

## अनुसूची

[ कलम २(३) पहा]

पुढील मंडळाच्या अधिकारक्षेत्रांतील प्रदेश.

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये रचना केलेली महानगरपालिका ; किंवा १८८८ चा मुं. ३, १९४९ चा मुं. ५९, १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २,

(२) पुढील अधिनियमान्वये रचना केलेली नगरपालिका -

(अ) मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५, १९२५ चा मुं. १८,

[2][ * * * * * ]

(क) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, १९०१ चा मुं. ३,

[2][ * * * * * ]

(इ) मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२, किंवा १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २,

(फ) हैदराबाद जिल्हा नगरपालिका, अधिनियम, १९५६ किंवा १९५६ चा हैद्राबाद १८,

(ह) कटक अधिनियम, १९२४ अन्वये रचना केलेले कटक मंडळ. १९२४ चा २.

---

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ च्या कलम ३ अन्वये पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

२. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० अन्वये उप-खंड (ब) व (ड) वगळण्यात आले.